# अर्जाचा नमुना

| कार्यालयीन उपयोगासाठी | | |
|---|---|---|
| 1 | अर्ज क्रमांक | |
| 2 | अर्ज स्वीकारल्याचा दिनांक | |
| 3 | अर्ज स्वीकारण्याची स्वाक्षरी (दिनांकासह) | |

सूचना: 1. अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावे.
2. अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी आवश्यक नसेल तेथे

## अर्जदाराची माहिती

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव

| अर्जदाराचे संपूर्ण नाव | आडनाव | नाव | वडीलांचे / पतीचे नाव |
|---|---|---|---|
| मराठी | | | |
| इंग्रजी | | | |

२) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

३) दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक. ------------------------------ ई-मेल आयडी -----------------------------------

४) जन्म तारीख (अंकात व अक्षरात) ----------------------------------------------------------------------------

५) जाहिरातीचे दिनांकास वय ------------------- वर्ष - ---------------- महिने - ------------ दिवस - ----------

६) लिंग : पुरुष / महिला ७) जात - ------------------------------

८) धर्म : ---------------------------------- ९) प्रवर्ग: ------------------------------

१०) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय? होय/नाही

११) अवगत असलेल्या भाषा : मराठी / हिन्दी / इंग्रजी

१२) शैक्षणिक अर्हता:

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव विद्यालय/महाविद्यालय | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| पदवी | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | |
| पदविका | | | | | |
| इतर | | | | | |

(१३) अर्जदाराची इतर माहिती :

(अ) उमेदवाराने अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? होय / नाही

(ब) उमेदवाराने यापुर्वी केलेल्या कामाचा तपशील

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेतील पदनाम | कामाचा विस्तृत तपशिल |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

(१४) अर्जदाराविरुद्ध यापूर्वी कोणताही दखलपात्र अथवा अदखलपात्र गुन्हा दाखल आहे का? होय / नाही

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी. श्री. / सौ. / कु. ------------------------------------------------------ या द्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो / करते की, वरील माहिती जाणपूर्वक तसेच विश्वास पूर्वक दिले असून तो खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतानुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चूकीची असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील व त्या बाबतीत माझ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाहीस मी प्राप्त राहील. तसेच भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेल.

दिनांक
ठिकाण

अर्जदाराची स्वाक्षरी
(अर्जदाराचे पुर्ण नांव)

*सोबत अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाण पत्रांच्या प्रमाणीत केलेल्या छायांकित प्रती जोडल्या आहेत.

# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## प्रधानमंत्री आवास योजना (शहर स्तरीय तांत्रिक कक्ष)

### थेट मुलाखत (Walking Interview)

महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रआयो 2024/प्र.क्र.87/गृनिधो-2 दिनांक - 15 ऑक्टोबर, 2024 अन्वये प्रधानमंत्री आवास योजना- 2.0 "सर्वांसाठी घरे" अंतर्गत जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव मध्ये सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता शहरस्तरीय तांत्रिक कक्ष स्थापन करण्यात येणार असून या कामी खालील नमूद करण्यात आलेली पदे थेट मुलाखती द्वारे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार आहेत. तरी दिनांक – 28/03/2025 रोजी सकाळी- 10:00 वाजता जळगाव शहर महानगरपालिकेच्या सभागृह, माळा क्र. 2 येथे विहित शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांची थेट मुलाखत आयोजित केलेली आहे.

| अ.क्रं. | पदाचे नांव | पदाची संख्या | मानधन प्रती महा | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1 | Town Planning Specialist / Urban Planner | 1 | 50000 /- | 1. उमेदवाराने अर्बन प्लानींग / स्थापत्य अभियांत्रिकी मधील मान्यता प्राप्त विदयापिठाची पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.<br>2. उमेदवाराकडे अर्बन प्लानींग क्षेत्रातील कामाचा अनुभव असावा. महानगरपालिका स्तरावरील प्रधानमंत्री आवास योजना तसेच या योजनेशी समकक्ष किमान 2 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>3. इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व असावे. |
| | | | 45000/- | 1. उमेदवाराने स्थापत्य अभियांत्रिकी मधील मान्यता प्राप्त विदयापिठाची पदवी धारण केलेली असावी.<br>2. उमेदवाराकडे अर्बन प्लानींग क्षेत्रातील कामाचा अनुभव असावा. महानगरपालिका स्तरावरील प्रधानमंत्री आवास योजना तसेच या योजनेशी समकक्ष किमान 5 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>3. इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व असावे. |
| 2 | Municipal / Civil Engineer | 1 | 45000/- | 1. उमेदवाराने स्थापत्य अभियांत्रिकी मधील मान्यता प्राप्त विदयापिठाची पदवी धारण केलेली असावी.<br>2. उमेदवाराकडे अर्बन प्लानींग किंवा महानगरपालिका स्तरावरी प्रधानमंत्री आवास योजनेशी समकक्ष किमान 2 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>3. इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व असावे. |
| | | | 35000/- | 1. उमेदवाराने स्थापत्य अभियांत्रिकी मधील मान्यता प्राप्त विदयापिठाची पदवीका धारण केलेली असावी.<br>2. उमेदवाराकडे अर्बन प्लानींग किंवा महानगरपालिका स्तरावरी प्रधानमंत्री आवास योजनेशी समकक्ष किमान 5 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>3. इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व असावे. |
| 3 | MIS Specialist | 1 | 45000/- | 1. उमेदवाराने संगणक अभियांत्रिकी मधील मान्यता प्राप्त विदयापिठाची पदव्युत्तर / पदवी धारण केलेली असावी. एमसीए पदवी धारण केलेली असावी.<br>2. उमेदवाराकडे शासकीय / निमशासकीय / खाजगी क्षेत्रात किमान 2 वर्षाचा अनुभव अर्बन प्लानींग किंवा महानगरपालिका स्तरावरी प्रधानमंत्री आवास योजनेशी समकक्ष किमान 2 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>3. इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व असावे. |
| | | | 35000/- | 1. उमेदवाराने संगणक अभियांत्रिकी मधील मान्यता प्राप्त विदयापिठाची पदवीका धारण केलेली असावी. एमसीए पदवी धारण केलेली असावी.<br>2. उमेदवाराकडे शासकीय / निमशासकीय / खाजगी क्षेत्रात किमान 2 वर्षाचा अनुभव अर्बन प्लानींग किंवा महानगरपालिका स्तरावरी प्रधानमंत्री आवास योजनेशी समकक्ष किमान 5 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>3. इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व असावे. |

अर्ज करण्याची पध्दत :

1. वर नमुद पदांसाठी करावयाचा अर्ज आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगांव सरदार वल्लभभाई पटेल टॉवर, प्रशासकीय इमारत, महात्मा गांधी रोड, नेहरू चौक, जळगांव – 425001 यांचे कार्यालयात किंवा पोष्टाने दि. 20/03/2025 ते दि. 26/03/2025 पर्यंत 10.00 ते 5.30 वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. शासकीय सुट्टीचे दिवशी कार्यालयात अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.
2. अर्जाचा नमूना सोबत जोडला आहे. सदर अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूस ठळक अक्षरात (CLTC) तांत्रिक पदासाठी अर्ज असे नमूद करावे.
3. या कार्यालयात दि26/03/ 2025 रोजी 5.30 वाजे नंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच पोष्टाने दि. 26/03/2025 ~~/2025~~ पर्यंतचे 5.00 वाजेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

जाहिराती नुसार नेमणूक करण्यात येणाऱ्या (CLTC) या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:

1. कामाची तपासणी करणे, बांधकाम परवानगीनुसार काम सुरू आहे किंवा नाही हे तपासणे
2. भुवन ॲप्लीकेशन वर जिओ टॅगींग करणे
3. PFMS प्रणालीवरून लाभार्थ्यांना हप्ता देणे, MPR भरणे व वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र मा. शासनास सादर करणे.
4. वेळोवळी मा. केंद्र व राज्य शासनाकडून घेण्यात येणाऱ्या बैठकींस आवश्यक माहितीसह उपस्थित राहणे.
5. शहराचा कृती आराखडा, DPR यांच्या समन्वयाने मा. शासनाचे राज्यस्तरीय तांत्रिक कक्षात कागदपत्रे वेळेवर सादर करणे, सुनिश्चित करणे.
6. चालू असलेल्या तांत्रिक संस्थांशी संलग्न करण्यात तांत्रिक सहाय्य प्रदान करणे, पायाभूत सुविधांच्या कामांची रचना आणि पर्यवेक्षण आणि चांगल्या दर्जाची खात्री करणे.
7. शहराच्या कृती आराखड्याचे आणि डीपीआरचे अचूक आणि तपशीलासाठी पुनरावलोकन करणे आणि आवश्यकतेनुसार अभिप्राय देणे.
8. बांधकामाच्या प्रगतीबद्दल अचूकपणे अहवाल देण्यासाठी महानगरपालिकेला मदत करणे आणि HFA अंतर्गत निधीचा योग्य वापर करणे बाबत मार्गदर्शन करणे.
9. मा. आयुक्त तथा प्रशासक अथवा वरीष्ठांकडून वेळोवेळी सोपविण्यात येणारे कामकाज करणे,

अटी व शर्ती :

1. महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रआयो 2024/प्र.क्र.87/गृनिधो-2 दिनांक - 15 ऑक्टोबर, 2024 अन्वये सदरची नेमणूक ही फक्त प्रधान मंत्री आवास योजने करिता कंत्राटी तत्त्वावर ठोक वेतनावर असून त्याचा जळगांव शहर महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. सदर योजना बंद झाल्यास अथवा काम पूर्ण झाल्यास सेवा संपुष्टात येईल. सेवेत कायम करणे बाबत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.
2. केवळ गुणांकीत व सुचिबध्द उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविले जाईल. सदरचे पद हे निव्वळ मानधन तत्वावर भरावयाचे आहे. सुरवातीस निवड झालेल्या उमेदवारास ११ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात कामाचे आदेश देण्यात येतील. उमेदवाराची कामगिरी समाधान कारक असेल व योजनेची आवश्यकता असेल तरच उमेदवारास मुदतवाढ दिली जावू शकते अन्यथा उमेदवाराची सेवा संपुष्टात आणणेत येईल.
3. मुलाखतीस पात्र उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे व सर्व प्रमाणपत्रांची साक्षांकित सत्यप्रतीसह मुलाखतीस स्वखर्चाने खालील कागदपत्रांसह उपस्थित रहावे. पासपोर्ट साईज फोटो - 2, आधारकार्ड झेरॉक्स - 2, पॅनकार्ड झेरॉक्स - 2 अनुभव प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे मुलाखतीवेळी सोबत ठेवावे.
4. उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या उमेदवार यांना प्राधान्य देणेत येईल.
5. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
6. जर कमी प्रमाणात अर्ज आले तर निवडीसाठी निकष कमी होऊ शकतो.
7. नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्या नंतर रुजू अहवाल मा. प्रशासक तथा आयुक्त जळगाव शहर महानगरपालिका, जळगांव यांच्याकडे त्वरीत सादर करणे अनिवार्य आहे.

8. उमेदवाराने केलेल्या दैनंदिन कामकाजाचा अहवाल सदर योजनेच्या नोडल अधिकारी पंतप्रधान आवास योजना प्रमुख जळगाव शहर महानगरपालिका यांचेकडे ठेवावा.
9. पंतप्रधान आवास योजना संबंधी अंमलबजावणी आपणास वरिष्ठांनी दिलेल्या सूचनेनुसार व केंद्र / राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करणे बंधनकारक राहील.
10. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत केलेल्या कामाचे दस्ताऐवजीकरण अद्यावत करणे तसेच कार्यालयीन कामकाजकरिता विभाग/शहर स्तरावरील बैठकीना उपस्थित राहणे बंधनकारक राहील.
11. कामकाज करतांना कोणत्याही प्रकारचा अपघात/वित्तहानी/जीवितहानी झाल्यास अपघाता संबंधी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई या कार्यालयामार्फत अनुद्येय राहणार नाही.
12. आपणांस प्राप्त होणारी कार्यालयीन कागदपत्रे, दस्तऐवज, माहिती व आधार सामुग्री बाबत गोपनीयता बाळगणे बंधनकारक राहील.
13. आपल्यावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल असल्यास/झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
14. नियुक्तीच्या कालावधीत आपण कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कारण न देता तात्काळ रद्द करण्यात येईल
15. नियुक्तीबाबतचा अंतिम अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक सो जळगाव शहर महानगरपालिका, जळगांव यांनी राखुन ठेवला आहे.
16. शैक्षणिक अर्हता अनुभव व अर्हतेबाबत अन्य प्रमाणपत्र / कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील, तसेच मुलाखतीस पात्र केल्यास मुलाखतीच्या वेळेस मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील

सही/-
प्रशासक तथा आयुक्त
जळगाव शहर महानगरपालिका, जळगांव